# जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर, यांचे कार्यालय,

ई-मेल- chandrapur.rdc@ gmail.com दुरध्वनी क्रमांक- 07172-250659

क्र.एमएजी/कार्या-8/टे.1/2020/ 462 दिनांक:- 14 / 08/2020

वाचा:-
1. भारतीय साथरोग प्रतिबंधक कायदा,1897 चे कलम 2,3,4
2. आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005
3. महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्रं.डीएमयु/2020/सीआर-92/डिआयएसएम-1 दि. 29.07.2020.
4. या कार्यालयाकडील आदेश क्रं. एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/748/2020 दिनांक 31.07.2020.

## :: आदेश ::

ज्याअर्थी, देशांतर्गत तसेच चंद्रपूर जिल्हयामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव व प्रसार यात झपाटयाने वाढ होत आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणूचा (कोविड-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 व आपत्ती प्रतिबंधक अधिनियम 2005 पासुन लागू केलेला आहे. चंद्रपूर जिल्हयात कोरोना विषाणूमुळे होणा-या कोविड-19 या आजारावर नियंत्रण व प्रसार रोखण्याकरीता विविध उपाय योजना सुरु आहे.

ज्याअर्थी चंद्रपूर जिल्हयात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याच्या दृष्टीकोनातून संदर्भिय क्रं. 03 वरील आदेशाचे अनुषंगाने या कार्यालयाकडील संदर्भिय क्रं. 04 वरील आदेशानुसार सार्वजनिक, सर्व प्रकारच्या धार्मीक कार्यक्रमास बंदी घालण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पोळा व तान्हा पोळा या सणामध्ये पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर नियंत्रण करणे व त्यावर प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे आवश्यक आहे असे निर्देशनास येत आहे.

त्याअर्थी मी अजय गुल्हाने, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण चंद्रपूर, कोविड-19 मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता चंद्रपूर जिल्हयात या वर्षी मोठा पोळा व तान्हा पोळा साध्या पध्दतीने साजरा करण्याकरीता खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश पारीत करीत आहे.



Scanned with CamScanner

1. चंद्रपूर जिल्हयात मोठा पोळा व तान्हा पोळा हा सण सार्वजनिक रित्या साजरा करण्यास निर्बंध लावण्यात येत आहे.
2. यावर्षी कोणत्याही गावात बैल पोळा भरवण्यात येवू नये. पोळा हा सण साजरा करतांना बैलांची पुजा वा अन्य धार्मिक कार्यक्रम घरीच साजरा करण्यात यावा.
3. पोळा व तान्हा पोळा निमित्य होणा-या बैल सजावट स्पर्धा, मिरवणूका, शोभायात्रा यावर निर्बंध घालण्यात येत आहे. तथापि काहि ठिकाणी तान्हा पोळयाच्या दिवशी काही धार्मिक विधी असल्यास असा विधी जास्तीत जास्त 5 लोकांच्या उपस्थितीत करण्यात यावा.
4. सांस्कृतिक कार्यक्रमा ऐवजी आरोग्य विषयक उपक्रम / शिबीरे उदा, रक्तदान, प्लाझ्मा दान आयोजित करण्यास प्राधान्य देण्यात यावे आणि त्यांचे प्रतिबंधात्मक उपाय तसेच स्वच्छता याबाबत जनजागृती करण्यात यावी.
5. पोळा साजरा करतांना बैलाच्या मिरवणूक काढण्यात येऊ नयेत.
6. आरती, पुजा वा अन्य धार्मिक कार्यक्रम आयोजित/साजरा करतांना गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच ध्वनी प्रदुषणा संदर्भातील नियमांचे व तरतुदीचे पालन करण्यात यावे.
7. बैलांची पुजा करतांना कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी वैयक्तिकरित्या मास्क, सॅनेटायझरचा वापर करावा तसेच सोशल डिस्टन्सींगचे पालन करण्यात यावे.
8. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र शासनाव्दारे वेळोवेळी निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सुचना व निर्देशाचे पालन करणे बंधनकारक राहील.

उपरोक्त अटी व शर्तीचे अधिन राहून सदर आदेश दिनांक 14 /08/2020 रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी पारीत करीत आहे.

स्वा/-
(अजय गुल्हाने)
जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर

प्रति :- **माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.**

1. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
2. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालीका चंद्रपूर
3. उपविभागीय अधिकारी, (सर्व)
4. तहसिलदार (सर्व)
5. संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, (सर्व)
6. मुख्याधिकारी, नगर परिषद/नगर पंचायत, (सर्व)

जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर

Scanned with CamScanner